(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

Navjyot / Vol. IX / Issue – III ISSN 2277-8063

# कोरोना विषयक समज गैरसमज यामागील सामाजिक वास्तव

श्री.अजितकुमार भिमराव पाटील. कसबा बावडा कोल्हापूर, (महाराष्ट्र)

Email :ajitkumar6911@gmail.com Mo.No : ९८२३९९६९११

......................................................................................................................................

**प्रस्तावना** : सूर्य उजाडला की, दिवस कसा जाईल, याची आपल्यातील बहुतेक जण काळजी करीत असतात अणी सूर्य अस्ताला गेला की, आपल्यातील भय आणि चिंता निदान त्या दिवसापुरती मनातून निघून गेली असते. हा तर खरा जवनाचा खेळ आहे. एक धागा सुखाचा तर दोन धागे दु:खाचे असते अधूनमधून सर्वांना याची अनुभूती येत असते. प्राक्तनापलीकडचे कुठले जग आहे का? जगण्याचा आनंद तर साऱ्यांनाच आहे, पण मृत्यूची कल्पना करवतसुध्दा नाही. मात्र, 'कोरोना' या जिवघेण्या विशाणूने आपल्यातील जीवन–मरणाचा संघर्ष अधिकच तीव्र केला आहे. कुणी साधी कल्पनाही केली नसेल की, एवढया गंभीर संकटाचा आपणास सामना करावा लागेल, परंतु साल उजाडले आणि अख्ख्या जगाला 'कोरोना' ने भयभीत केल. निदान हे साल तरी आयुश्य बदलून टाकेल, अशी खुणगाठ बांधलेल्या मानवी मनाच्या कल्पनेला 'कोरोना' ने विचार करण्यास बाध्य पाडले. म्हणता ना कालचक्र कोणी थांबवू षकत नाही, पण किमान दूर सार. 'हा माठा, तो छोटा' हा आपल्यातील असणार न्यूनगंड बाजूना सारा. गरीब–श्रीमंतातील भेदभावाच्या भिंती दूर सारा. श्रमिकांविषयी आदरभाव ठेवा. जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांना संकटकाळात साथ द्या. हातावर पोट असणाऱ्या दीनदुबळयांना मदत करा. कठीण प्रसंगात जे काय म्हणून करता येईल ते करा. जगणे तुमच्या हाती आहे. काळ थोडा सांगून येतो. भावा... 'कोरोना' ने खूप काही सांगितले आहे.

**१. लॉकडाऊन आणि माणुसकी.**

कोरोनाच्या संकटानंतर देशात गेली जवळपास तीन महिने लॉकडाऊन सुरू आहे. लोक विषेशत: गरीब, मध्यमवर्गीय जे कामाच्या निमित्ताने स्थलांतरित झाले होते, त्यांचे प्रचंड हाल झाले. एकीकडे त्यांच्या जगण्याचा संघर्श सुरू होता, तर दुसरीकडे यांना जगवण्यसाठी नागरिक धडपडत होते. जगण्यासाठी धडपडत होता तो माणूस आणि जगवण्यसाठी धडपडत होती ती माणुसकी. मदतीचे फोटो टाकणाऱ्यांना हिणवले गेले. 'गरजू आहोत, भिकारी नाही', हे एक वाक्य अनेक मदत करणाऱ्यांच्या डोळयांत अंजन घालून गेले;पण म्हणून काही मदत करणारे सगळेच चमाकोगिरी करणारे नव्हते. असंख्य हात प्रसंगी स्वत:च्या खिशाला अधिकची झळ सहन करत आजही 'जगवण्यसाठी' धडपडत आहेत. अनेक ठिकाणी अजाणतेपणी अपात्री दानही केलं जात आहे; पण म्हणून काही माणुसकी कमी ठरत नाही. मदत करणाऱ्यांचे फोटो पाहून ती चमकोगिरी वाटण्यापेक्षा आणखी अनेकांना मदत करण्याची इच्छा झाली तर चांगलेच.

**२.कोरोनाचा बाऊ नको!**

कोरोनाच्या संकटानंतर एक प्रकारची अस्थिरता आली आहे. रोज वाढणारी रूग्णसंख्या आणि रोज वाढणारे बळी, यामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आपल्या परिसरातील कुणाला तरी कोरोना झालाय. मग आत तो आपल्यालाही होणार आणि सगळं संपणार. खरं तर यात असं काहीच होणर नी. उगीच आकडेवारी पाहून घाबरून जाऊ नका. सरकार, प्रशासन किंवा यंत्रणा हा आजार पसरू नये यासाठी लॉकडाऊन, क्वारंटाईन, कंटेन्मेंट झाोन तयार करत आहे. जनजागृतीसाठी जिवाचे रान करत आहे. या आजाराचे स्वरूप आणि तोड माहिती नसल्यानेच जगातील सर्वच देशांच्या सरकारांमध्ये अस्थिरता आहे. जो–तो आपापल्या परीने या रोगापासून नागरिकांना दूर ठेवावे, यासठी वेगवगळे प्रयोग करू पाहतो आहे. आपण मात्र अर्धवट ऐकतो, अर्धवटच समजून घेतो आणि उगाच त्याचा बाऊ करत सुटतो. कोरोनाचे हे संकट कधी संपेल माहिती नाही. यावर कधी औषध सापडेल, हेही माहिती नाही. त्यामुळे आता 'कोरोना के साथ है जीना' असा पर्याय पुढे येत आहे. जर याचा बाऊ न करता आपण समजदारीने वागलो आणि सुरक्षिततेचे सर्व नियम पाळले तर काहीच अडचण येणार नाही. समजा आपल्यालाही कोरोना झालाच तर? तर आपण काही लगेच मरणार नी. देशात आजघडीला सव्वा लाख रूग्ण आहेत

आणि त्यातले केवळ चार हजार मृत्युमुखी पडले आहेत. त्यामुळे या संकटाचाच नाही, तर आजाराचही जर धीराने सामना केला तर आपण यावरही सहज मात करू शकतो.

**३.अपमानाच भावना नकोच!**

लॉकडाऊननंतर महानगरांमध्ये स्थलांतरित झालेले अनेक नागरिक आत आपापल्या गावी परत येत आहे. मात्र, त्यांना गावात घेतले जात नाही. घेतले तरी गावात, घरी राहू दिले जात नाही. मग अशावेळी अनेकांना ते अपमानास्पद वाटत असल्याच किस्से पाहायला मिळत आहेत. खरे तर गावात शिकलेले, वाढलेले हे लोक शहरात गेले आणि स्थायिक झाले. त्यांची प्रगती झाली यात गावकऱ्यांना आनंदच. मात्र हीच मंडळी सुटयांसाठी गावी आल्यावर आपण कुणीतरी खूप मोठे किंवा खूप पुढारलेले आहोत, अशा आविर्भावात वावरताना दिसायची, आपल्याच आप्तस्वकीयांकडे तुच्छ नजरेनं पाहायची किंवा गावातला कुणी शहरात काही दिवसांसाठी आला तर त्यांना शहरी लाईफस्टाईल कळत नाही म्हणून नाक—डोळे मुरडायची. आता याच साऱ्यांना गावात प्रवेशापूर्वी गावच्या षाळेत किंवा गावाबाहेर कुठे तरी काही दिवस राहण्यास सांगितले जात असताना, याच्यात अपमानाची भावना असण्याचे काहीच कारण नाही. आमच्या घरात शहरातून आलेल्या लोकांची माहिती प्रशासनाला का सांगितली, म्हणून हाणमारी होत असल्याच्याही बातम्या येत आहेत. अशांना कोरोना हा की मान—अपमानाचा विषय नाही, तर तो समजून घेण्याचा आणि काळजी घेण्याचा विषय असल्याचं कधी समजेल?

एक मात्र खरे, जग कितीही प्रगती करेल किंवा काहीही होईल. मला आणखी हवं किंवा त्याच्यापेक्षा जास्त माझयाकडं हवं ही भावना, मीच कसा शहाणा माझयाकडेच असावीत सत्तसूत्रे, लाकांनी मला विचारले पाहिजे, ही वृत्ती माण्सातून पर्यायाने आपल्यातून कधीच कमी होणार नाही आणि म्हणूनच जग कधीच सुधरणार नाी. मग कुणी महान आत्मा जन्माला येवो किंवा कुणी आजरणातूनही आपल्याला ते दाखवून देवो, आपण कधीच बदलणार नाही,हेच खरे.

**४.पृथ्वीवर माणूसच असा प्राणी**

पृथ्वीवर माणूसच असा प्राणी आहे की, त्याला जगण्यसाठी मोठा संघर्ष करावा लागतो. या संघर्शाच्या पाऊलखुणा इतिहासात नोंदविलेल्या आहेत. इतिहासातील पाऊलखुणा बघूनही तो डगमगला नाही आणि आलेल्या संकटातही तो जगत आहे. त्याने सिकंदरासरखे विजय अन् जपानसारखे उद्ध्वस्त झालेल्या देशांचे पराभव पचवले आहेत. जगात जे आले ते सर्वच नष्ट होण्यासाठी आहे आहे; त्याला माणूसही अपवाद नाही. सध्या कोरोनाच्या संकटात संपूर्ण जगच मरणकळा सोसताना दिसत आहे. यापूर्वी मरणकळा आल्या नाही अशातला भाग नाही. त्या कळा आल्या; पण एकाचवेळी जगावर धावून आल्या नाहीत. वेगवगळया राष्ट्रांत त्याचा शिरकाव होता. मात्र कोरोनाच्या संसर्गाने संपूर्ण जगालाच वेठीस धरल्याने माणूस पुरत हतबल झाला अन् भविष्यात काय? असा सवाल स्वत:लाच विचारतो आहे.

**५.विज्ञान तंत्रज्ञान**

विज्ञान, तंत्रज्ञानाने प्रगती झाली अन् विकासाचा टप्पा ओलांडला. मानवाच्या अवस्थांपैकी सर्वात विकसित टप्प्यात सध्यचे युग आहे. मात्र संकटात तुमचे तंत्रज्ञान, विज्ञान मानवाचे प्राण वाचविणारे नसेल तर त्याची किंमतही षून्य होऊन जाते. कारण केवळ भौतिक सुविधांनी आयुश्य फुलत नाही तर काळीजकप्पा असलेल्या माण्साचा प्राण की जीव पाहिज. हा जीव इतीपासून इथपर्यंत सध्या कोरोनाचाच विचार करत आहे. विचार करून त्याच्या मेंदूलाही झिणझिण्या येत आहेत. त्याला जगण्याच प्रश्न नाही, मरणाचा प्रश्न नाही, तर कोरोना नष्ट होणर नाही काय? त्याच्या प्रश्नांच्या भडिमारात भविष्याचे स्वप्न सामावलेले आहे. अर्थत पुढच्या पिढीचे काय? आता तर जागतिक आरोग्य संघटनेनेही सांगमन टाकले की, कोरोना कधीच नष्ट होणार नाही! देशोदशी कोरोनाचे संकट निर्माण झाल्यानंतर त्याच्या निर्मितीच्या शोधमागे अनेकजण लागले. कारण 'निर्मिती' ही शोधाची जननी असते. शोध सुरू आहे, अद्याप यश हाती लागले नाही. हे यष येणार नसेल तर जगाच्या पाठीवर माणसाच्या 'अंधारलेल्या वाटा' कायम राहती. कोरोनापूर्वीही जगात गरीब आणि श्रीमंतांची दरी होती, ती कोरोनानंतरही राहील. श्रीमंतीच्या व्यवस्थेला कोणतीही संकटे

आली तरी प्रश्नांचे मजल चढवावे लागत नाहीत. मात्र गरिबाला सदैव प्रश्नांत जगावे लागते. हे प्रश्न सोडवता सोडवता त्याची पुढची पिढीही गरिबीतच जीवन व्यतित करते. अशावेळी कोरोनाच्या प्रश्नाने अस्वस्थतेचा काळ आणला खरा; पण मानस शास्त्रीयदृष्टया त्याच्या 'धनाचा वाटा' काय राहणार? हे गरिबांचे जग आहे.

**६.शारीरिक अंतर**

'शारीरिक अंतर' राखण्याचे आवाहन करण्यात आले. माणसाने माणसापासून अंतर ठेवून राहणे, पर्यायाने कोरोनाने संपूर्ण जगालाच अस्पृष्य करून टाकले. आत तो नष्टच होणर नसल्यामुळे ही अस्पृश्यता कायम राहणार आहे. पण किती दिवस, किती काळ? जगातील कष्णवर्णीय आणि भारतातील दलित यांना गतकाळात जीव्यवस्थेचा सामना कराव लागला. त्यांचा स्पर्ष तर सोडा, त्यांची सावलीही निशिध्द होती. कारण त्यांना कोणतही सामाजिक, राजकीय अधिकार मिळत नव्हते. माणसे असूनही माणसासारखे जगता येत नव्हते. हजारो वर्शाची ही परंपरा अद्यापही शोधली तर सापडून येईल. मात्र कोरोनाने संपूण्र जगालाच अस्पृश्यतेच्या खाईत लोटल्याने जगाचे आता समाजशास्त्र कोणते? माणूस समाजशील प्राणी आहे. तो समाजात वावरणारा आहे. आता कायम अंतर राखायचे असल्याने तो कोणत्या समाजात राहणार? त्याला आता एका नव्या समाजरचनेची गरज भासणार आहे. ही समाजरचना कोणचा भेदभाव अन् अस्पृश्यताही पाळणारी नसावी, कारण माणसाचे माणसासाठी युध्द आहे. एकीकडे अर्थव्यवस्था तर दुसरीकडे रोजगाराच नवी व्यवस्था विकसित करावी लागणार आहे. ही व्यवस्था निर्माण करण्यस आपल्याला अपयश आले तर माणसाच्या वाटा उद्ध्वस्ततेच्या राहतील अन् अंधारलेल्या वाटही कायम राहतील. खरे तर सुख अन् दु:ख हेच मानवी आयुश्याचे तत्वज्ञान आहे. सुखासाठी माणसाची धडपड सुरू असते; पण आता कोरोनासेबतही आपल्याला जगणं शिकावं लागणार आहे. 'एचआयव्ही' यारखे अनेक आजार जगातून नामषेश झाले नाहीत; पण संशोधकांनी एक उपचारपध्दती विकसित केली. मात्र 'एड्स' सामूहिक संसर्ग नही. 'कोरोना' मात्र सामूहिक संसर्ग असल्याने त्याच्याविरोधात रोगप्रतिकारक घमता विकसित करण्यसाठी किती वर्शाचा काळ लागणार? हे सांगणे सध्यातरी कठीण आहे. इतिहासाचा मागोवा घेतला तर अंधाराची कितही युगे आली तरी माणूस प्रकाशवाट निर्माण करणारच आहे. गेल्या अठ्ठावीस युगांपासून विठ्ठलही विटेवर उभा आहे. माणसानेही उभे राहण्याची क्षमता विकसित करावी. उद्या आपणही कोरोनाला पराभूत करू, अशा आत्मश्विासचे गर्वगीत गाऊ, आत्मविश्वास ठेवू. षेवती अंधरलेल्या वाटांत उजेड आपल्यालाच पेरायचा आहे.


**७. भौतिक प्रगती :—**

जगामध्ये आज भौतिक प्रगती फार झालेली दिसत आहे. त्यास कारण विज्ञानातील प्रेरणाच दिसून येतात. बदलत्या काळानुसार त्याप्रमाणे परिस्थितीमध्ये सुध्दा बदल होणे योग्यच आहे. परंतू या विकासाला मानवताधर्माची आणि नैतिक मूल्यांची जोड असणे आवश्यक आहे. तरच मानवावर कोणत्याही प्रकारचे संकट येणार नाही. चांगले संस्कार वादी विचार जर मानवास आत्मसात झाले नाहीत तर मनुष्य हाच एक चंगळवादी बनेल. क्षणिक सुखाकडे आकर्षिला जाईल याचे त्यास भान राहिले पाहिजे. विज्ञानाच्या जोरावर त्याने भौतिक प्रगती अफाट केली आहे. भौतिक प्रगती करत असताना त्याने इतरांकडे सुध्दा माणुसकीच्या भावनेतून इतरांना मदत केली पाहिजे. एकमेकांच्या सानिध्यात राहिल्यामुळे तो एकमेकांत 'माणुसकीच्या धाग्याने' गुंफुन राहतो. गुंफुन राहिल्यामुळे मानवता धर्म निर्माण झाला. माणुसकीची अनेक उदाहरणे आपण समाजामध्ये पाहतो. की, लोक नैसर्गिक आपत्तीत एकमेकांना धर्म, जात, देश, पंथ, उच्च, निच न पाहता मदत करण्यासाठी धावून जातात. उदा. पूर, भूकंप, दुष्काळ, वादळ इत्यादी प्रसंग आलेस मदतीचा हात पुढे करतात. आम्ही सर्व भारतीय आहोत एकमेकांचे बांधव आहोत, मित्र आहोत याप्रमाणे सहकार्य करतात ज्याचे कारण या जगातील कोणताही मनुष्य यामधून वेगळा राहू शकत नाही

**कोव्हिड १९ च्या उद्रेकाचा भारत सामना करू शकेल?**

'कोव्हिड १९' चा प्रसार रोखण्यसाठी देशभरात लॉकडाउन लागू करण्यात आले आहे. या आजाराच्या रूग्णांची संख्या वाढत असली, तरी आर्थिक चक्र सुरू करण्यासाठी लॉकडाउन शिथिल

करण्याची तयारी सुरू कली ओ. मा., त्यामुळे लोक घराबाहेर पडल्याने संसर्ग वाढण्याचा धोकाही ओ. चीनने दहा दिवसांत कोरोनाबाधितासाठी हॉस्पिटल तयार केले होते. तर भारतात रेल्वेच्या डब्यांत विलगीकरणाची सोय करण्यात आली आहे. सध्य देषात रूग्णांसाठी पुरेशा प्रमाणत बेड असल्याचे दिसत. मात्र, टेस्टिंग किट आणि व्हेंटिलेटरच कमतरता जाणवत आहे. कोरोनाचा माठ फटका बसलेल्या काही राज्यांत बेड आणि विलगीकरण सुविधांची कमतरता जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर देषातील तयारीचा आढावा.




**'कोव्हिड १९ सद्यस्थिती'**

ॲक्टिव्ह केसेस : ४१,४७२. घरी सोडलेले रूग्ण : १९,३७५

**एकूण वैद्यकीय सुविधा**

७,७४० (एकूण ७३९ जिल्हयांपैकी ४८३ जिल्हयांत उपलब्ध) विलगीकरण बेड: ५,५६,७६९ पॉझीटिव्ह रूग्णांसाठी बेड : ३,०५,५६७ संशयित रूग्णांसाठी बेड : ३,५१,२०४ रेल्वेच्या डब्यांत विलगीकरण वॉर्ड : १५ राज्यांतील २१५ स्टेशनवर ही सुविधा ऑक्सिजन सपोर्टेड बेड : ९९,४९२ ऑक्सिजन मॅनिफोल्ड असलेल्या सुविधा : १६९६ आयसीयू बेड : ३४,०७६ : १०५०

**मेडिकल ऑक्सिजन सिलिंडर**

उपलब्ध : ४.३८ लाख सिलिंडरची ऑर्डर दिली: १.०३ लाख औद्योगिक ऑक्सिजन सिलिंडरचे : ५ लाख रूपांतर करण्याचे नियोजन सिलिंडर मिळाले : ६० हजार

**आरटी—पीसीआर चाचणी किट**

Navjyot / Vol. IX / Issue – III ISSN 2277-8063

मागणी : ३५ लाख ऑर्डर: २१.३५ लाख मिळाले: १३.७५ लाख

**पर्सनल प्रोटेक्टिव्ह इक्विपमेंट**

प्रस्तावित मागणी: २.०१ कोटी एकूण ऑर्डर : २.२२ कोटी देशांतर्गत ऑर्डर:१.४२कोटी मिळाले : १७.३७ लाख येत्या दोन महिन्यांत: १.१५ कोटी देशांतर्गत पुरवठा

आयात : आयात: १०००

**ऑक्सिजन**

एकूण क्षमता : ६,४०० टन वैद्यकीय ऑक्सिजनचा वापर : १००० टन रूग्णलयांत ऑक्सिजन निर्मितीची सुविधा : ४०९ क्रायोजेनिक टॅंकर देशात वाहतुकीसाठी उपलब्ध : १०५०

**मेडिकल ऑक्सिजन सिलिंडर**

उपलब्ध : ४.३८ लाख सिलिंडरची ऑर्डर दिली: १.०३ लाख औद्योगिक ऑक्सिजन सिलिंडरचे : ५ लाख रूपांतर करण्याचे नियोजन सिलिंडर मिळाले : ६० हजार

**निश्कर्ष :**

१. सर्वांच्या किमान गरजा भागवणारी, म्हणजेच सर्वांना स्वच्छ हवा, पाणी, अन्न, निवारा, आरोग्य व शिक्षण पुरविण्यसाठी सध्याच्या उत्पादन व्यवस्थांची पुनर्ररचना करण्यात यावी. यासाठी लोकांना रोजगार, उत्पन्न, चरितार्थ पुरवणारी शेतजमीन, पाणी यांची मालकी व विनियोग अधिकार जे प्रत्यक्ष कुणबि करतात, म्हणजे शेतात नांगर हाकतात, पेरतात, धान्य व अन्य शेतमाल तयार करतात त्यांना आणि फक्त त्यांनाच असावा. यासाठी कसणाऱ्यांचीच जमीन व शेती हा कायदा महाराष्ट्र विधिमंडळाने तत्काळ संमत करावा. सोबतच शहरी जमिनी व मालमत्तेबाबत हेच धोरण असाले. सोबतच शहरी जमिनी व मालमत्तेबाबत हेच धोरण असावे. हे करण्याचे आजवर टाळल्यामुळेच, दारिद्रय—कुपोषण, विषमता— वंचितता वाढली असून अकारण स्थलांतर केल जाते. याचे धोके कोरोनोत्तर काळात प्रगट होत आहेत. ज्यांच्या श्रमाने सर्व काही चालते ते किती निराधार आहेत, हे आपण बघत आहोत.

२.मनरेगा व महाराष्ट्र रोजगार हमी या दोन्ही स्त्रोतांव्दारे पुरेसा निधी वापरून राज्यातील एक कोटी श्रमजीवी लोकांना रोजगार द्यावा. ग्रामीण भागात पाणलोट क्षेत्र विकासासाठी या श्रमशक्तीचा वापर करण्यात यावा. सोबतच शहरी भागासाठी रोजगारहमी योजना लागू करून उत्पादकीय काम करून घेता येतील. स्वच्छता, वनीकरण, गृहनिर्माण यासाठी रोजगार हमीचा वापर करून बेरोजगारी दूर करता येईल. पर्यावरण संरक्षण— संवर्धनाचे महत्वाचे काम यामधून साध्य होऊ शकेल. यात सर्वांना उत्पादकीय रोजगार मिळेल. अर्थपूर्व रोजगाराची संकल्पना रूढ होईल.

३.सोबतच रासायनिक व औद्योगिक शेतीऐवजी सेंद्रिय शेतीला प्राधान्य देऊन विषमुक्त अन्न, दूध, भाज्या, फळे तयार केल्यास जनतेचे आरोग्य सुधारेल. रसायनिक आदानावरील खर्च कमी होऊन शेती परवडेल. जनतेला सात्त्विक अन्न मिळेल, रोगप्रतिकारशक्ती वाढेल.

४.मोटारवाहने, प्लास्टिक तसेच घातक रसायनिक उद्योगांना कोणत्याही करसवलती, अर्थसहाय्य न देता टप्प्याटप्प्याने ते बंद करून या कारखान्यांच्या स्थापित क्षमता सायकल व तत्सम उत्पादनासाठी वापरल्या जाव्यात. मुख्य मुद्दा आहे पर्यावरणस्नेही सार्वजनिक वाहतुकीचा. व्यक्तिगत वापराच्या खाजगी व कार्यालयीन मोटारीना पूर्णपणे बंदी घातली जावी. हा बडेजाव पृथ्वी विरूध्द गुन्हा आहे.

५.पंचतारांकित हॉटेलांचे रूपांतर दवाखान्यात करण्यात यावे. यापुढे पर्यटनाच्या नावाने चैनचंगळवाद, मौजमस्ती बंद करून त्याला प्रकृतिदर्शन, निसर्ग निरीक्षणामध्ये रूपांतरित करावे.

६.राज्यात सर्वत्र दारूबंदी, गुटखा, तंबाखू व अन्य अमली पदार्थांच्या उत्पादन, वितरण व सेंवनांवर बंदी घालणेत यावी.

७.मंत्रालयापासून अन्य कोठल्याही कार्यालयात जनतेला कामासाठी यावे लागू नये. सेवाहामी कायदा, आयोग तसेचसरकारी यंत्रणा व कर्मचाऱ्यांनी स्वत: होऊन जनतेपर्यंत पोहोचावे.

८.शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील नफेखोरीची दुकानदारी थांबवून व्यापक सार्वजनिक हिताचे महत्त्व लक्षात घ्यावे. राज्यात संपत्ती व उत्पन्नाची विषमता कमी करण्यासाठी कमाल पगारावर मार्यदा तसेच संपत्ती व वारस कर लागू करण्यात यावा.

९.महाराष्ट्र राज्याचे उत्पन्न ३० लाख कोटी एवढे असून शासनाला कर रूपाने किमान तीन लाख कोटी रूपये अतिरिक्त कर महसूल मिळू षकतो.

१०. यापुढे राज्यातील प्रशासन, न्यायदान, शिक्षण संशोधनाची भाषा ही अग्रक्रमाने राज्यभाषा म्हणजेच मराठी करण्यात यावी. केंद्र सरकारशी होणारा व्यवहार हिंदीत व्हावा. उच्च न्यायालयातील कामकाज व निकाल देखील मराठीत यावेत.

**संदर्भ ग्रंथसुची :**

१. लता पाटील,शिवाजी पाटील:'सुलभ केंद्र संमेलने', प्रणव प्रकाशन,इचलकरंजी, २००५
२. मुळे, माधुरी., :'श्रध्दा अंधश्रध्दा',प्रयास प्रकाशन, नागपुर — १५, २००३.
३. दाभोळकर, नरेंद्र :'विज्ञान विवेक आणि विद्यार्थी',राजहंस प्रकाशन, पुणे, २०१३.
४. फोंडके, बाळ, :'अनुरेणू'अस्मिता प्रकाशन, पुणे — ४११०३०,१९९९
५. काबरे, जगदीश., :'विज्ञाननिष्ठ निबंध,' लोकवाङःमय गृह, प्रभादेवी, मुंबई
६. शिरवाडकर ,वसंत, :'अवकाशाचा शोध,' पृथ्वी प्रभादेवी, मुंबई,१९८४.
७. घाटे ,निरंजन, :'आकाशगंगा ,'.अनुजा प्रकाशन, पुणे, १९०३
८. महाले ,रमेश :'अंतराळातील घडामोडी,'मंजुल प्रकाशन, पुणे, २००५.
९. नारळीकर ,जयंत, :'विज्ञान आणि वैज्ञानिक,'श्री विद्या प्रकशन, पुणे १९९२.

**दैनिक संदर्भ**

१.दैनिक पुण्यनगरी, बुधवार, १७ मे २०२०, अंक ३९ पृ.क्र ९
२.दैनिक पुण्यनगरी, गुरूवार, २५ मे २०२० पुण्यनगरी, अंक १३७, पृष्ठ क्र १०
३.दैनिक महाराष्ट्र टाइम्स, मंगळवार, १२ मे २०२०, पृ. क्र. ८